**प्रस्तावना :- भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.३ च्या कार्यक्षेत्रातील कचरा संकलन व वहन करणेसाठी प्रसिद्ध करण्यात आलेली फेर ई-निविदा सुचना क्र.८ टेंडर क्र.११०१४९७ या निविदेस प्राप्त झालेले निविदाकार व निविदाकारांनी सादर केलेल्या खर्चास मा. प्रशासक तथा आयुक्त सो.यांची मान्यता मिळणे बाबत.**

घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत प्रभाग समिती क्र.३ च्या कार्यक्षेत्रातील घरोघरचा दैनंदिन १०० टक्के कचरा संकलन व वहन करणेसाठी विभागामार्फत फेर ई-निविदा सुचना क्र.०८ टेंडर क्र.११०१४९७ मा. प्रशासक तथा आयुक्त सो.यांनी दिलेल्या दि.०६/०९/२०२४ रोजीच्या मान्यतेनुसार दि.०७/०९/२०२४ ते दि.१८/०९/२०२४ या कालावधी करिता http://mahatender.gov.inया संकेतस्थळावरप्रसिद्ध करण्यात आली होती. सदर कालावधीत सण, उत्सव व इतर कारणास्तव मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांनी दि.१६/०९/२०२४ रोजी दिलेल्या मान्यतेनुसार सदर निविदेस दि.१९/०९/२०२४ ते दि.२५/०९/२०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असता याकामी ४ निविदाकार प्राप्त झाले असल्याचे संगणक विभागाच्या दि.२५/०९/२०२४ रोजीच्या अहवालात निदर्शनास आले होते.

प्रभाग समिती क्र.०३ च्या कार्यक्षेत्रातील कचरा संकलन व वहन करणेसाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या निविदेस प्राप्त ४ निविदाकार यांनी निविदेच्या अटी शर्तीनुसार आवश्यक कागदपत्रांची पूर्ततेची तपासणी नियुक्त तांत्रिक सल्लागार मे. ऑल इंडिया इन्स्टीट्युट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट, नाशिक यांचे मार्फत करण्यात आली असुन नियुक्त तांत्रिक सल्लागार यांनी दि.०२/१०/२०२४ रोजी दिलेले अहवालाच्या अनुषंगाने मा. निविदा समितीने दिलेल्या मान्यतेनुसार प्राप्त ४ निविदाकारांपैकी फक्त १ निविदाकार पात्र ठरविण्यात आले असता महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, उर्जा व कामगार विभागाचे शासन निर्णय क्रमांक: भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४ मधील प्रकरण-४ मुद्दा क्र.४.४.३.१ मधील तरतुदीनुसार प्रभाग समिती क्र.३ करिता फेर ई-निविदा सुचना क्र.८ टेंडर क्र.११०१४९७ प्रसिद्ध करण्यात आली असता त्याकामी ६ निविदाकार प्राप्त झाले असता नियुक्त तांत्रिक सल्लागार यांनी दि.११/१०/२०२४ रोजी दिलेल्या अहवालानुसार प्राप्त ६ निविदाकारांपैकी ३ निविदाकार पात्र होत असुन मा. निविदा समितीच्या मान्यतेने पात्र ३ निविदाकार यांचे आर्थिक बोलीचा लिफाफा-२ (फायनानशियल) खुले करण्यात आले असता खालील तक्त्या प्रमाणे त्यांनी दर सादर केले आहेत.

| अ.क्र. | प्राप्त निविदाकाराचे नाव | तांत्रिक दृष्ट्या पात्र / अपात्र | सादर केलेला एकुण खर्च | प्राप्त लघुत्तम दर (टक्केवारी) |
|---|---|---|---|---|
| १ | **मे. प्रियंका थोरवे कन्स्ट्रक्शन, नवी मुंबई** | पात्र | **रु.५५,३२,६५०/-** | **L1(-15.08%)** |
| २ | मे. एन एच पटेल कॉन्ट्रक्टर, नाशिक | पात्र | रु.५९,८८,८१६/- | L2(-8.08%) |
| ३ | मे. सुजीत बाळासाहेब खरात, भिवंडी | पात्र | रु.६१,५६,६७५/- | L3(-5.5%) |

वरील तौलोनिक तक्त्याचे अवलोकन केले असता भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.०३ च्या कार्यक्षेत्रातील घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कचरा संकलन व वहन करणेकामी मे. प्रियंका थोरवे कन्स्ट्रक्शन, नवी मुंबई यांनी सर्वात कमी दराची निविदा रक्कम रु.५५,३२,६५०/- मात्र भरली असुन सदरचे प्राप्त दर हे निविदेतील अंदाजपत्रकिय रक्कमेच्या रु.९,८२,३५०/- इतकी कमी भरली असुन निविदा अटी शर्तीनुसार नियुक्त तांत्रिक सल्लागार यांनी ३ वर्षासाठी होणाऱ्या खर्चाचा अहवाल सादर केला असुन सदरचा खर्च खालील तक्त्या प्रमाणे आहे.

Annexture –I ZONE -3

| Sr No. | Detail | 1st year | 2nd Year | 3rd Year |
|---|---|---|---|---|
| 1 | Estimated Project Cost | 6515000/- | | |
| 2 | L1 Cost | 5532650/- | 5809282/- | 60,99,746/- |
| 3 | Tender % below | 15.08% | 15.08% | 15.08% |
| 4 | Total Project cost for 1st year | 66391800/- | 69711390/- | 73196959/- |
| 5 | Performance security 3 year Bank Garrenty 2% | 70,36,000/- | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | Bank Garrenty 2% | | | |
| 6 | Additional Security Deposit in | 6.16% | 6.16% | 6.16% |
| 7 | Additional Security Deposit in Rs. | 40,89,734/- | 42,94,221/- | 45,08,932/- |
| 8 | Total Security Deposit | 1,11,25,734.88/- | - | - |
| 9 | Stamp Duty for Agreement 3 year | 2,08,000/- | - | - |

उपरोक्त तक्त्याच्या अनुषंगाने होणाऱ्या खर्चास मा. स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.परंतू मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (क) नुसार संविदा होणेसाठी होणाऱ्या खर्चास मा. प्रशासक तथा आयुक्त सो.यांची मान्यता मिळणेकामी प्रशासकिय ठराव घेणेस विनंती आहे. तसेच संबंधित संस्थेस कार्यादेश देणेकामी मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांनी दि.३०/११/२०२४ रोजी मान्यता दिली असुन संबंधित संस्थेस कार्यादेश निर्गमीत करुन दि.११/१२/२०२४ रोजी पासुन घनकचरा व्यवस्थापनाचे काम सुरु करुन होणाऱ्या खर्चास मंजुरी मिळणेस विनंती आहे.

**प्रशासकिय ठराव क्र.:-** ६९८ **दिनांक :-**१०/१२/२०२४

भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.०३ च्या कार्यक्षेत्रातील घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कचरा संकलन व वहन करणेकामीमे. **प्रियंका थोरवे कन्स्ट्रक्शन, नवी मुंबई** यांनी रु.५५,३२,६५०/- असे सर्वात कमी दराची निविदा सादर केली असुन सर्वात कमी दर सादर केलेले निविदाकार यांना व त्यांनी सादर केलेल्या खर्चास व नियुक्त तांत्रिक सल्लागार मे. ऑल इंडिया इन्स्टीट्युट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट, नाशिक यांनी प्राप्त दराच्या अनुषंगाने विभागाने प्रस्तावनेत प्रस्तावित केलेल्या तीन वर्षासाठी होणाऱ्या खर्चास मा. प्रशासक तथा आयुक्त सो.यांची मान्यता मिळणे बाबत विभागाने शिफारस केली आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग२)/ नवि, दि.६/०६/२०२२ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५२ अ (१अ) व १ (ब) च्या तरतुदी नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार **मी, अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**, घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत प्रभाग समिती क्र.३ च्या कार्यक्षेत्रातील कचरा संकलन व वहन करणेकामी मनपाच्या http://mahatender.gov.inया संकेतस्थळावरफेर ई-निविदा सुचना क्र.०८ टेंडर क्र.११०१४९७ मध्येमे. प्रियंका थोरवे कन्स्ट्रक्शन, नवी मुंबईयांनी रु.५५,३२,६५०/- सर्वात कमी दर सादर केले असुन मनपाच्या अंदाजपत्रकिय रक्कमेच्या रु.९,८२,३५०/- कमी दराच्या (रु.५५,३२,६५०/-) निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३(क) नुसार मे. प्रियंका थोरवे कन्स्ट्रक्शन, नवी मुंबई या ठेकेदार संस्थेसमवेत करारनामा करुन दि.११/१२/२०२४ रोजी पासुन घनकचरा व्यवस्थापनाचे कार्यादेश देणे कामी व आवश्यकतेनुसार बदल करणेकामी अधिकार राखुन ठेवुन यासाठी उपरोक्त प्रस्तावित प्रमाणे दि.११/१२/२०२४ रोजी पासुन ३ वर्षा करिता होणाऱ्या खर्चास प्रशासकिय व आर्थिक मंजुरी देत आहे.

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त,**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**

**65- MY DOC-2024 (HELATH DEP PRASTAVN – 2024)P-B**